महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक
दिंडोरी रोड, म्हसरुळ, नाशिक - ४२२ ००४
दूरध्वनी क्र. (०२५३) २५३९२९१

# सुचना

राज्यातील नोंदणीकृत होमिओपॅथी वैद्यक व्यावसायिकांसाठी "आधुनिक औषधशास्त्र" प्रमाणपत्र हा एक वर्ष कालावधीचा अभ्यासक्रम शासन निर्णय क्र. एमएचसी २०१४/प्र.क्र.३०८/१४/शिक्षण-२, दि.१३ ऑगष्ट २०१४ नुसार विद्यापीठाशी संलग्नित असलेल्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये सुरु करण्याबाबत विद्यापरिषदेने मान्यता प्रदान केली आहे. सदर अभ्यासक्रमास प्रवेश घेण्यास इच्छूक असलेल्या उमेदवारांनी विहित नमुन्यात ऑनलाईन अर्ज दि. ३०/०६/२०१७ पावेतो रु.५०००/- (विनापरतीचे) शुल्क ऑनलाईन पध्दतीने भरण्याबाबत कळविण्यात आले होते. ऑनलाईन अर्जाची प्रिंट आवश्यक कागदपत्रांसह दि. ०७/०७/२०१७ पर्यंत विद्यापीठात सादर करण्याबाबत कळविण्यात आले होते. सदर ऑनलाईन अर्ज सादर करण्याची मुदत दि. १५/०७/२०१७ पर्यंत वाढविण्यात येत आहे. त्यानुसार आवश्यक बदल करण्यात आलेला ऑनलाईन अर्ज व सुधारित माहिती पुस्तिका विद्यापीठाच्या www.muhs.ac.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहेत.

महाराष्ट्र होमिओपॅथी परिषद, मुंबई यांचेकडे प्रथम ०१ ते ३०,००० क्रमांकाच्या नोंदणी केलेल्या ईच्छुक नोंदणीकृत व्यावसायिकांनी शैक्षणिक वर्ष २०१७-१८ च्या प्रवेश प्रक्रियेसाठी अर्ज करावे. ३०,००० नोंदणी क्रमांकाच्या पुढील नोंदणीकृत व्यावसायिकांनी सदर शैक्षणिक वर्ष २०१७-१८ च्या प्रवेश प्रक्रियेसाठी अर्ज करु नये. असे अर्ज प्राप्त झाल्यास ते रद्द करण्यात येईल. याची नोंद घ्यावी.

विशेष सुचनाः- ज्या उमदेवारांनी दि. १५/०६/२०१७ रोजी विद्यापीठ संकेतस्थळावर व वर्तमानपत्रात प्रसिध्द करण्यात आलेल्या जाहिरातीनुसार दि. ३० जुन २०१७ पावेतो अर्ज सादर केले आहे, त्यांनी नव्याने अर्ज सादर करण्याची आवश्यकता नाही. तथापि, अर्ज सादर केलेल्या उमदेवारांना नव्याने समाविष्ठ झालेल्या ०४ वैद्यकीय महाविद्यालयांचा अनुषंगाने प्राधान्यक्रमात बदल करावयाचा असल्यास, अशा उमदेवारांनी मुळ ऑनलाईन अर्जामध्ये प्राधान्यक्रमात बदल करुन ०४ पृष्ठांच्या ऑनलाईन अर्जाची प्रत (कुठलेही सहपत्र अथवा शुल्काव्यतिरिक्त) सादर करणे बंधनकारक राहील. तसेच, ज्या उमेदवारांनी वरील विहीत मुदतीत अर्ज केला नसेल, असे उमेदवार देखील दि. १५/०७/२०१७ पर्यंत अर्ज करण्यास पात्र राहतील. सदर ऑनलाईन अर्जाची प्रिंट काढुन सदरचा अर्ज सर्व आवश्यक त्या कागदपत्रांसह दि. २२/०७/२०१७ पर्यंत सादर करावा.

सुचनाः- आधुनिक औषधशास्त्र प्रमाणपत्र अभ्यासक्रमास प्रवेश घेण्याची आकांक्षा बाळगणाऱ्यांना (**aspirants**) स्पष्ट करण्यात येते की, सदर अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेणे व ते पुढे चालू ठेवणे हे रिट पिटीशन क्र. ७८४७/२०१४ या प्रकरणात मा. मुंबई उच्च न्यायालय देईल त्या आदेशाच्या अधिन राहील व तसे प्रतिज्ञापत्र सादर करणे बंधनकारक राहील.

स्वा/-
(डॉ. कालिदास द. चव्हाण)
प्र.कुलसचिव